C-521

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA N 367720

24 MAY 2013

अनुक्रमांक 9498 दिनांक ........ रुपये 500/-

मुद्रांक कोणत्या कारणासाठी वापरायचा आहे Agreement

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे अनुच्छेद क्र. —

मुद्रांक वापरणाऱ्याचे संपुर्ण नांव YASHADA

संपुर्ण पत्ता Baner Rd pune 7

हस्ते व्यक्तीचे संपुर्ण नांव J. M. Thorat

पत्ता pune

24/5/13

मुद्रांक धारकाची / हस्ते व्यक्तीची सही.

स्वाक्षरी
(पुणे लॉयर्स कन्जु.को.ऑप सोसा.लि.)
मुद्रांक विक्रेता
परवान्याची क्र.:2201111
परवान्याची मुदत:31 March 2014
कोर्ट आवार पुणे

उप कोषागार अधिकारी
कोषागार पुणे करिता
20 MAY 2013

## करारनामा

करारनामा आज दि. 24 मे, 2013 रोजी औरंगाबाद मुक्कामी येथे करीत आहे.

करारनामा लिहून घेणार

श्री. एस. बी. झनझन
उपआयुक्त (सिडको) तथा
मुख्य अग्निशमन आधिकारी
महानगरपलिका, औरंगाबाद

जा.आ.क्र./म.न.पा./अबाद/ 264

दिनांक 20/6/2013

कर्नल व्ही. एन. सुपनेकर
संचालक, आपत्ती व्यवस्थापन केंद्र
यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन
प्रबोधिनी (यशदा), पुणे

करारनामा लिहून देणार

औरंगाबाद, महानगरपालिका, औरंगाबाद व यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), **पुणे** **यांच्यामध्ये** करारनामा करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका **अग्निशमन विभागासाठी** दिनांक 25/07/2006 च्या शासन निर्णयात निश्चित केल्यानुसार प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करण्यासंबंधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (Detail Project Report) करुन देण्यास तयार आहोत.

1) औरंगाबाद महानगरपालिका यांचेकडील पत्र जा. क्र. मनपा/ अशाद 1213/2013 दि. 18/01/2013 अन्वये अग्निशमन विभागासाठी प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करण्यासंबेधीचा सविस्तर प्रकल्प अहवाल करून **देण्यास** (पत्र क्र. आव्यके/2012/डीपीआर दि. 01/10/2012 नुसार) यशदा, पुणे ही संस्था तयार आहे.
2) सदरील सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी आपलेकडील पत्र क्रं. जा. क्रं. मनपा/अशाद/1213/2013 दि. 18/01/2013 अन्वये रुपये 13 लाख दरास मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानंतर कोणत्याही कारणास्तव वाढीव रक्कम मागणार नाही.
3) प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करण्याचा प्रकल्प अहवाल तयार करतांना औरंगाबाद, जालना व बीड जिल्हयांचा समावेश केलेला असून सदर जिल्हयांचा अभ्यास करावा लागेल.
4) औरंगाबाद, जालना व बीड परिसरातील सर्व धोकादाय व आपत्ती ठिकाणाची माहिती घेऊन (जसे मोठमोठया नदया, पुरात बाधीत होणारे गांवे, भुकंप होणारे ठिकाणे, परिसरातील पेट्रोल/डिझेल पंप, रॉकेल एजन्सी, गॅस पंप, हायराईज इमारती, रेल्वे लाईन, विमानतळ, केमीकल्स कारखाने, इतर कारखाने, व इतर अतिसंवेदनशील ठिकाणे इत्यादीची सविस्तर माहितीसह) प्रकल्प अहवाल बनवला जाईल.

C-523

5) प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्राचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनवताना परेड ग्राऊंड, हेली पॅड, कार्यालय, कंट्रोल रूम, लेक्चर हॉल, रिक्रियशन हॉल, ट्रेनिंग हॉल, लायब्ररी, स्टाफ क्वार्टर्स, ड्रील टावर्स, होज रॅम्प्स, व्हेईकल रॅम्प्स, पाण्याचा हौद, विहीर, गोडाऊन, फायर टेंडर, रेस्क्यु व्हॅन, क्रेन्स, जे.सी.बी. मशीन, रुग्णवाहिका, टर्न टेबल लॅडर्स, ब्रान्टो स्कायलिफट लॅडर्स, कम्युनिकेशन व्हॅन, आधुनिक रेस्क्यु साहित्य, वायरलेस सेट, संगणक व इंटरनेट सुविधा, अधिकारी/कर्मचारी, इतर अत्यावश्यक सुविधा अशा सर्व सुविधा समावेश देण्यात येईल.
6) प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापनेसाठी प्रकल्प अहवाल बनविणे, तसेच प्रकल्प अहवालामध्ये महाराष्ट्र शासनाने सुचविलेल्या त्रुटीमध्ये दुरुस्ती करणे इथपर्यंत मर्यादित राहिल. अंतिमता संपूर्ण अहवाल तयार करुन महानगरपालिकेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येईल यासाठी सहा महिने कालावधी लागेल. (प्रकल्प अहवालात सामाविष्ट माहिती परिशिष्ट 'अ' प्रमाणे )
7) महानगरपालिका/ शासनाकडून आवश्यक ती महिती मिळण्यास जेवढया कालावधीसाठी दिरंगाई होईल तेवढा कालावधीत अहवाल सादर करण्यास वाढ होईल.
8) यशंवतराव चव्हाण प्रबोधिनी (यशदा) पुणे ही महाराष्ट्र शासनाची अंगीकृत संस्था असल्याने ठेकेदारासंबंधी असणारे महानगर पालिकेचे नियम, अटी, शर्ती संस्थेस लागू असणार नाही.
9) यशदा, पुणे ही संस्था एकूण खर्चाच्या 60 % रक्कम महानगरपालिका कामाचे आदेशासोबत अदा करावयाचे आहे. उर्वरीत 40 % रक्कम आराखडा सादर केल्यावर 20 दिवसाच्या आत अदा करावे लागेल.
10) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करतांना काही वाद उदभवल्यास मा. महासंचालक यशदा व मा. आयुक्त, महानगरपालिका यांचा संयुक्तीक निर्णय अंतिम राहील.

11)सदरील करारनामा महानगर पालिकाकडून यशदा या संस्थेस प्रकल्प अहवाल बनविण्यासंबधी मंजुरी प्राप्त झाल्यावर त्यासोबत 60 % अग्रीम रक्कम 7,80,000/- चा धनादेश अथवा डिमांड ड्रॉफट मा. महासंचालक, यशदा यांच्या नावावर प्राप्त झाल्यावरच ग्राहय धरला जाईल.

साक्षीदार

1) 24/06/13 मो. जाफर खान C.R.O.

2) 24/6/13 R. P. Dandge CRO

करारनामा लिहून देणार

सुपनेकर वि.न.

संचालक

आपत्ती व्यवस्थापन केंद्र

करारनामा लिहून घेणार

28/6/13

उपआयुक्त (सिडको) तथा मुख्य अग्निशमन अधिकारी महानगरपलिका, औरंगाबाद

मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग, महानगरपालिका औरंगाबाद